
महाराष्ट्र पोलीस
अवैध दारु भट्टीवर
ठाणे ग्रामीण पोलिसांची कारवाई
5,14,500/- गावठी हातभट्टी दारु जप्त
अवैध दारु निर्मिती व विक्रीस आला घालण्यासाठी मोहिम सुरुच
अवैध दारु भट्टी नष्ट
मोठ्या प्रमाणात रसायन व साहित्य जप्त
कायदेशीर कारवाई सुरु

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**
**एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,**
E-MAIL ID –lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

प्रेस नोट क्र. १३ दिनांक :- ०१.०६.२०२६

## स्थानिक गुन्हे शाखेची अवैध गावठी हातभट्टी दारु निर्मीती करु पहाणा-यां विरुध्द धडक कावाई

--------------------ooooo--------------------

मा. श्री डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात छुप्या रितीने बेकायदेशीर गावठी हातभट्टी दारु निर्मीती/विक्री करु पहाणाऱ्या विरुध्द प्रभावी व परिणामकारक कारवाई करुन गावठी हातभट्टी दारुचे समुळ उच्चाट करण्याचे आदेश केले.

मा. पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचे आदेशा प्रमाणे पोलीस निरीक्षक, श्री संदीप गिते, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांचे नेतृत्वात पोउपनिरी महेश कदम या पथकाने शहापुर पोलीस ठाण्याचे हद्दीतील गावठी हातभट्टी दारु निर्मीतीची माहिती काढुन मौजे सरलांबे, भातसा नदी किनारी व खुटघर याठिकाणी छापे टाकले. छापा कारवाई दरम्यान एकुण ३,३१,५००/- रुपये किंमतीचे गावठी हातभटी दारु निर्मीतीकरीता लागणारे साधने, कच्चा माल मिळुन आला. आरोपीत संतोष नारायण बसवंत राहाणार खुटघर ता. शहापुर, राजेंद्र अनिल अधिकारी, राहाणार सरलांबे ता. शहापुर, श्रीकांत कृष्णा अधिकारी, राहाणार सरलांबे ता. शहापुर व अतुल केशव वलटे, राहाणार खुटाडी ता. शहापुर यांचे विरुध्द कारवाई करुन १) गुन्हा नोंद क्र. ।।। ३०७/२०२६ म. प्रो. ॲक्ट ६५ (फ), २) ।।। ३०४/२०२६ म. प्रो. ॲक्ट ६५ (फ), ३) ।।। ३०३/२०२६ म. प्रो. ॲक्ट ६५ (फ) प्रमाणे ३ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच पोउपनिरी रोहन शेलार, स्थागुशा, ठाणे ग्रामीण यांच्या पथकाने भिवंडी ता. पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रातील कालवार गाव येथील खाडी किणारी असलेल्या झाडा-झुडपात छापा टाकला असता, सदर छापा कारवाईत १,८३,०००/- रुपये किंमतीचे गावठी हातभटी दारु निर्मीतीकरीता लागणारे साधने, कच्चा माल मिळुन आला. आरोपीत नामे अनिल रमाशंकर शर्मा व रमेश मनोहर म्हात्रे, यांच्या विरुध्द भिवंडी ता. पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ।।। ४५८/२०२६म. प्रो. ॲक्ट ६५ (ई) (फ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, तसेच मा. श्री अनमोल मित्तल, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण याचे मार्गदर्शनाखाली व वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री संदीप गिते, स्थानिक गुन्हे शाखा यांचे नेतृत्वात पोलीस उप-निरीक्षक, महेश कदम,सफौ प्रकाश साईल,पोहवा संतोष सुर्वे, पोहवा गोविंद कोळी, पोहवा संदीप तांडेल, पोशि स्वप्नील बोडके,पोशि सुरेश धिंदळे, व पोउपनिरी रोहन शेलार, सफौ धनाजी कडव, पोहवा हनुमान गायकर, पोहवा सुहास सोनवणे, पोना योगेश शेळंदे, पोना जितेंद्र वारके या पथकांनी केली आहे.

*****************************************************